वृत्त वेध

सत्य, वस्तुनिष्ठता आणि समतोल

शुक्रवार ,१२ ऑक्टोबर २०१८, खंड: १६ , अंक: पाचवा , पाने : २

अग्रलेख : लैंगिक शोषणाविरोधातील 'मी-टू'मोहीम

दुष्काळी ढगांच्या छायेत महाराष्ट्र
पान २

'तितली' चे थैमान, आठ जणांचा मृत्यू

पीटीआय, अमरावती :

बंगालच्या उपसागरात कमी दाबाच्या पट्ट्यामुळे निर्माण झालेले शक्तिशाली 'तितली' चक्रीवादळ ओडिशा पाठोपाठ आंध्र प्रदेश व प. बंगाल मध्येही धडकले आहे. या वादळामुळे आंध्र प्रदेशच्या श्रीकाकुलम जिल्हयात आतापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाला आहे. ओडिशाचे मुख्यमंत्री नवीनपटनायक यांनी परिस्थितीची

माहिती घेतली असून त्यांनी गंजम, पुरी, खुर्दा, केंद्रपाडा आणि जगतसिंहपूर या जिल्ह्यातील कलेक्टरांना तटवर्ती भागात राहणाऱ्या नागरिकांची घरं तातडीने रिकामी करण्याचे आव्हान केले आहे. तसेच नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यासाठी निवारागृहे उभारण्यास सांगण्यात आले आहे 'तितली' हे चक्रीवादळ भयंकर असून बंगालच्या खाडीतील दक्षिण आणि पश्चिम मध्य क्षेत्राला या वादळाचा फटका बसला आहे. गोव्यावरही या चक्रीवादळाचा परिणाम होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

१२ ऑक्टोबरपर्यंत राज्यात अनेक ठिकाणी पाऊस कोसळण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे. दुसऱ्या बाजूने अरबी समुद्रात उठलेल्या लुबान चक्रीवादळाची गतीही आता वाढून ताशी ११० किलोमीटरवर गेल्यामुळे त्याची तीव्रता वाढली आहे. परंतु ते येमेनच्या दिशेने सरकले असल्यामुळे लक्षद्वीप वगळता भारतावर फारसा परिणाम होणार नाही.

गोव्यात काही ठिकाणी रविवारी व सोमवारी पाऊस पडला होता. मंगळवारीही काही प्रमाणात पाऊस कोसळला. लुबान चक्रीवादळ भारतीय उपखंडापासून दूर जात आहे. तर तितली बंगालच्या उपसागरातून भारतीय भूभागात शिरले आहे.

तितली वादळाने जनजीवन विस्कळीत

संक्षिप्त

मनु भाकरचा सुवर्णवेध

अर्जेंटिना, (पीटीआय) : भाराताची १६ वर्षीय नेमबाज मनू भाकरने युवा ऑलिम्पिकमध्ये १० मीटर एअर पिस्टल प्रकारात सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला आहे. मनूने २३६.५ अंकांची कमाई करत सुवर्णपदकाला गवसणी घातली. भारताला युवा ऑलिम्पिकमध्ये नेमबाजीत मिळालेले हे पहिलेवहिले सुवर्णपदक आहे.

मनू भाकरने याआधी वर्ल्डकप आणि राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णवेध घेतला होता. यंदाचं मनूचं विविध स्पर्धांमधील हे चौथं सुवर्णपदक ठरलं आहे.

मेहता नवे महान्यायवादी

नवी दिल्ली (पीटीआय) : मागील 11 महिन्यापासून रिक्त असलेल्या भारताच्या महान्यायवादी पदी गुजरातचे ज्येष्ठ विधीतज्ञ तुषार मेहता यांची नियुक्ती झाली असून कॅबिनेटच्या नियुक्ती समितीने त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले त्यांनी सरकारचे अनेक संवेदनशील खटले हाताळले असून ते गेली चार वर्ष अतिरिक्त महान्यायवादी म्हणून कार्यरत होते.

एसटीचा प्रवास महागला

मुंबई : वाढते डिझेलचे दर, खाजगी वाहतूक दाराशी तीव्र स्पर्धा, कर्मचाऱ्यांची पगार वाढ या सर्व अडचणीमुळे एसटीने पुढील महिन्यात दिवाळी दरम्यान दि.1 ते 20 नोव्हेंबर या कालावधीत 10 टक्के भाडेवाढ करण्याचा कठोर निर्णय घेतला आहे, यामुळे सणासुदीच्या काळात प्रवाशांना जादा दराने पैसे देऊन प्रवास करावा लागणार आहे, गत वर्षीही अशाच प्रकारे एसटीने भाडेवाढ केलेली होती.

स्वामी सानंद यांचे निधन

ऋषिकेश : गंगा नदी स्वच्छतेच्या मागणीसाठी बेमुदत उपोषणाला बसलेले पर्यावरणवादी कार्यकर्ते डी. जी. अग्रवाल उर्फ स्वामी सानंद (८६) यांचे उपोषणादरम्यान हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. गंगा नदीशेजारील जलविद्युत प्रकल्पांचे बांधकाम व खनन करण्यावर बंदी आणावी तसेच गंगा शुद्धीकरणासाठी स्वतंत्र कायदा निर्माण करण्यात यावा, इत्यादी मागण्या स्वामी सानंद यांनी सरकारकडे केल्या होत्या.

भारत-रशिया करारावर ट्रम्प संतप्त

एस-४०० करारावरून अमेरिकेचे कारवाईचे संकेत

पीटीआय, वॉशिंग्टन :

भारताने रशियाबरोबर केलेल्या एस-४०० एअर डिफेन्स मिसाइल सिस्टिमच्या खरेदी करारावर अमेरिकेने आपली भूमिका जाहीर केली असून राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाबरोबर केलेल्या या कराराबद्दल भारतावर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत.

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन मागच्या आठवडयात भारत दौऱ्यावर

आले होते. त्यावेळी दोन्ही देशांमध्ये एस-४०० करार झाला. अमेरिकेने सीएएटीएसए कायद्यातंर्गत रशियाकडून शस्त्रास्त्र विकत घेण्यावर बंदी घातली आहे.

काल व्हाईटहाऊसमध्ये पत्रकारांशी संवाद साधताना ट्रम्प यांनी लवकरच भारतावर काय कारवाई होते ते तुम्ही लवकरच पहाल असे सांगितले. त्यामुळे भारतावर अमेरिकेकडून निर्बंध घातले जाण्याची शक्यता आहे.

यापूर्वी अमेरिकेने रशियाकडून शस्त्रास्त्र विकत घेतले म्हणून चीनवर अशा प्रकारची कारवाई केली आहे.

एस-४०० ही जगातील सर्वात अत्याधुनिक एअर डिफेन्स सिस्टिम आहे.

'मी-टू'साठी समिती

नवी दिल्ली :

मी टू मोहिमेअंतर्गत समोर येणाऱ्या प्रकरणांच्या चौकशीसाठी चार सदस्यीय समिती स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा मनेका गांधी यांनी केली.

ही समिती 'मी टू' मोहिमेतून समोर येणाऱ्या घटनांचा तसेच दाखल झालेल्या गुन्ह्यांचा सखोल अभ्यास करेल .महिलांच्या सुरक्षेसाठी कायद्याची चौकट अधिक बळकट करण्यासाठी केंद्रीय महिला व बालकल्याण मंत्रालयाने पुढाकार घेतला आहे

विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे उपोषण मागे

सागर रौंदळ , पुणे :

मागेल त्या विद्यार्थ्याला कमवा व शिका योजनेचा लाभ मिळावा व पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जयकर ग्रंथालयाचे सभासद मिळावे या मागण्यांसाठी गेल्या तीन दिवसांपासून विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे उपोषण सुरू होते. मात्र काल रात्री उपोषणकर्त्या विद्यार्थ्यांची तब्येत खालावल्याने तीन विद्यार्थ्यांना ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

या पार्श्वभूमीवर बुधवारी संध्याकाळी विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या मागण्यांची दखल घेत या मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिले व दुसऱ्यांदा एमए करणाऱ्या विद्यार्थ्यांना कमवा-शिका योजना देण्यासाठी विद्यापीठातील सिनेट सदस्यांची त्रिस्तरीय समिती नेमली असून त्याद्वारे ज्या विद्यार्थ्यांना तिसऱ्या वर्षात कमवा शिका हवी असल्यास त्यांचा केस टू केस अभ्यास करून त्यांना प्रवेश देऊ, तसेच जयकर ग्रंथालयाचे सभासत्व देण्यात येईल असे आश्वासन दिले. म्हणून विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी बुधवारी अखेर संध्याकाळी आपले उपोषण मागे घेतले, या उपोषणास विकास खंडागळे, प्रताप हरकळ, हनुमंत कुसंगे, विजय तळेगावकर आदी विद्यार्थी बसले होते.

यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य प्रसेन जीत फडणवीस, प्राचार्य डॉ. संजय चाकणे, डॉ.सोमनाथ पाटील, सिनेट सदस्य भाग्यश्री मंठाळकर विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई उपस्थित होते.

नाना पाटेकरांविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल

मुंबई

अभिनेत्री तनुश्री दत्ताने लैंगिक शोषणाची लेखी तक्रार केल्यानंतर ओशिवरा पोलिसांनी बुधवारी रात्री अभिनेता नाना पाटेकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

भादवि ३५४ (विनयभंग) आणि ५०९ (अश्लील हावभाव) या अन्वये हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तनुश्रीच्या तक्रारीनुसार या गुन्ह्यामध्ये नृत्य प्रशिक्षक गणेश आचार्य, 'हॉर्न ओके प्लिज'चे निर्माते सामी सिद्दीकी, दिग्दर्शक राकेश सारंग यांचाही आरोपी म्हणून समावेश करण्यात आला असल्याची माहिती ओशिवरा पोलिसांनी दिली.

अभिनेत्री तनुश्री दत्ताने झूम टीव्ही ला मुलाखत देताना नाना पाटेकर यांनी 'हॉर्न ओके प्लिज' या चित्रपटाच्या सेटवर 2008 मध्ये लैंगिक छळ केल्याचा आरोप केला होता . या प्रकरणाबाबत तिने 'मी टू' मोहिमेअंतर्गत सोशल मीडियावर आवाज उठविल्याने चांगलीच खळबळ माजली .

पोलिसांनी जबाब नोंदवून घेतला नाही तर न्यायालयात जाण्याचा इशारा तिच्या वकिलांनी दिला होता.

अखेर या तक्रारीची दखल घेत ओशिवरा पोलिसांनी तिला जबाब नोंदविण्यासाठी बोलवून गुन्हा दाखल केला .या प्रकरणात अद्याप कोणालाही अटक केली नसून चौकशी करून पुढील कारवाई करण्यात येईल असे पोलिसांनी सांगितले.

डोवाल स्ट्रॅटेजिक पॉलिसी ग्रूपच्या अध्यक्षपदी

नवी दिल्ली :

देशाच्या सुरक्षेचा प्रश्न जिकरीचा झाला असताना केंद्र सरकारने आता भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यावर आता नवी जबाबदारी दिली आहे. डोवाल हे आता स्ट्रटेजिक पॉलिसी ग्रुपचे कॅबिनेट सचिव राहिले नसून आता ते एसपीजीचे अध्यक्ष झाले आहेत. याआधी एसपीजीचे अध्यक्षपद समुहाच्या कॅबिनेट सचिवांकडे असायचे,जे प्रशासनामधील सर्वात वरिष्ठ अधिकारी भूषवत. परंतू मोदी सरकारकडून या संबंधित सप्टेंबर महिन्यात अधिसूचना जारी केली होती, त्यानुसार आता एसपीजीच्या अध्यक्षपदी देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल असणार आहे

डोवाल यांच्याकडे आता ही नवी जबाबदारी आल्याने ते आता गेल्या 20 वर्षातील सर्वात शक्तीशाली सरकारी अधिकारी असतील. आता ते एसपीजीच्या सर्व बैठकांचे नेतृत्व करतील. त्याबरोबरच एसपीजीच्या कॅबिनेट सचिवांनी घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीविषयी मंत्रालये आणि त्याचे विभाग यांच्यातील समन्वय राखतील.

लिहिणाऱ्या स्त्रियांनी समाजाचे अदृश्य बंध तोडावे

मयूर डुमणे, पुणे :

स्त्रियांनी काय लिहावं, काय लिहू नये याचे अदृश्य नियम पुरुषी व्यवस्थेने घालून दिले आहेत. या अदृश्य बंधनांचा प्रभाव इतका आहे की बहुतांश वेळा स्त्रिया ती बंधने स्वतःवरती लादून घेतात आणि मोकळेपणाने व्यक्त होत नाहीत. पुरुषी व्यवस्थेने घालून दिलेली ही बंधने स्त्रियांनी तोडून लिहायला सज्ज झाल पाहिजे असं मत प्रसिद्ध कवियित्री अंजली कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

डॉ. सारिका शिंदे लिखित

कार्यक्रमाला उपस्थित किरण मोघे, अजित अभ्यंकर, श्रीपाल सबनीस आणि कवियत्री सारिका शिंदे.

आयुष्य या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनाच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या .कम्युनिस्ट पक्षाचे नेते अजित अभ्यंकर सामाजिक कार्यकर्त्या किरण मोघे आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष ,ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाल सबनीस या प्रसंगी उपस्थित होते. आपल्या समाजामध्ये लेखकांवरती अभिव्यक्तीची बंधनं ही कायमच आली आहेत.

लेखक,कवी,विचारवंत, कार्यकर्ते यांच्यासाठी आताचा जो काळ आहे तो अत्यंत निराशाजनक आणि भयभीत करणारा आहे आणि दिवसेंदिवस ही परिस्थिती आपल्याला तीव्र होताना दिसते आहे. लेखक कवींच्या स्वतंत्र वृत्तीवर घाला घातला जात असल्याचे मत देखील अंजली कुलकर्णी यांनी व्यक्त केले .समकालीन सांस्कृतिक व साहित्यिक चळवळी समोरील आव्हाने;या विषयावर बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस म्हणाले की भारतीय लोकशाही मध्ये लोकशाही मार्गाने निवडून आलेली कम्युनिस्ट सरकारे संपत चालली आहेत ,संत आणि क्रांतिकारक यांमध्ये भेदरेषा आखली जात आहे, फुले आणि आंबेडकर संतांपासून वेगळी मानली जात आहेत आम्ही आंबेडकर, फुले स्वीकारतो पण ज्ञानेश्वर ते संत तुकाराम ,शेख महंमद ही आपली परंपरा आपण स्वीकारत नाही ही आपल्या प्रबोधनाच्या चळवळीतील उणीव आहे.

लोकमान्य टिळक जीवनगौरव पत्रकारिता पुरस्कार जाहीर

मुंबई :

पत्रकारितेच्या क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी महाराष्ट्र शासनाच्यावतीने दिला जाणारा २०१६ आणि २०१७ साठीचा लोकमान्य टिळक जीवनगौरव पत्रकारिता पुरस्कार हा अनुक्रमे दैनिक हितवादचे संपादक विजय फणशीकर आणि साप्ताहिक विवेकचे संपादक रमेश पतंगे यांना जाहीर झाल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत केली. राज्य शासनाच्यावतीने

विकास वार्तांकनासाठी पत्रकारांना दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांचीही घोषणा मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. विकास वार्तांकनासाठी २०१६ साठीचा राज्यस्तरीय बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार हा रत्नागिरीचे राजेश जोष्टे (दै. पुढारी) यांना तर २०१७ साठीचा हा पुरस्कार कोल्हापूर चे बातमीदार लुमाकांत नलवडे, (दै. सकाळ,) यांना जाहीर करण्यात आला. मुंबईत लवकरच होणाऱ्या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

१ लाख रुपये आणि सन्मानचिन्ह असे लोकमान्य टिळक जीवनगौरव पत्रकारिता पुरस्काराचे स्वरुप आहे. तर ५१ हजार रुपये, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह असे इतर सर्व पुरस्कारांचे स्वरुप आहे. २०१६ व २०१७ च्या पुरस्कारांसाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक ब्रिजेश सिंह यांच्या अध्यक्षतेखालील पुरस्कार निवड समिती गठीत करण्यात आली होती.

निवड समितीत २०१६ साठी पत्रकार राजीव कुलकर्णी, प्रवीण मुळ्ये, पांडुरंग मस्के, राजकुमार सिंग, निलेश खरे, रमाकांत दाणी, राहुल पांडे, बबन वाळके, नितीन तोटेवार यांचा तर २०१७ च्या निवड समितीत पत्रकार विजय सिंह, क्लॅरा लुईस, सिद्धेश्वर डुकरे, उमेश कुमावत, भालचंद्र पिंपळवाडकर, शैलेंद्र तनपुरे, सत्यजित जोशी, विलास तोकले, कृष्णा शेवडीकर यांचा समावेश होता.

शारदीय नवरात्र उत्सवानिमित्ताने चतुःशृंगी मंदीर परिसरात संध्याकाळच्या वेळी झालेली गर्दी.

चतुःशृंगी देवीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

अनिल माने, पुणे :

थंडीची चाहूल त्यात रोषणाईने लख्ख झालेला प्रकाश अशा उत्साही वातावरणात चतुर्शृंगी देवीचा नवरात्र उत्सव गजबजलेला होता, नवरात्रीच्या दुसऱ्या माळेला भाविकांची गर्दी पाहायला मिळत होती तरी दुसऱ्या दिवशीचा रंग हा पिवळा होता. त्यामुळे मंदिर परिसरात मंदिर परिसरातील सर्व स्त्रियांची वेशभूषा पिवळ्या रंगाची होती नऊ रंगांच्यापैकी एक असलेला पिवळा रंग आज दुसऱ्या दिवशी होता यामुळे मंदिर परिसर महिला वर्गाच्या पिवळ्या साडीच्या पेहरावणे व पिवळ्या रंगाच्या फुलांनी न्हाहून निघाला होता. त्यात भाविकांनी खरेदीसाठी केलेली गर्दी दुकानदारांसाठी लक्ष्मी चा दिवस ठरला.

दुसरीकडे मंदिर व्यवस्थापनाची चोख व्यवस्था होती. भाविकांना पिण्याच्या पाण्याची सोय, कचरा व्यवस्थापन, आणि विशेश म्हणजे यावेळी महिलांसाठी स्तनपान कक्ष आहे, असे मंदिर व्यवस्था पणाचे कार्यकारी विश्वस्त दिलीप अनगळ यांनी सांगितले.

रूग्णवाहिका आणि अग्निशामक दल यांची व्यवस्थाही पुणे महानगरपालिकेतर्फे केली आहे. त्याचप्रमाणे दसऱ्याच्या दिवशी साडेपाच वाजता देवीची जी पालखी निघते त्यावर हेलिकॉप्टर मधून पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. पालखीसोबत पारंपरिक लेझीम पथके, ढोल ताशा आणि बँडचीही व्यवस्था करण्यात आली आहे. असेही मंदिर व्यवस्थापणाकडून सांगण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही दहा ते बारा लाख भाविक देवीच्या दर्शनासाठी येतील असे मंदिर व्यवस्थापनाने सांगितले चतुःशृंगी मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे पाचव्या दिवशी खणा नारळाने ओटी भरण्याची परंपरा आहे.

संपादकीय

लैंगिक शोषणाविरोधातील 'मी-टू' मोहीम

गेल्यावर्षी , ऑस्कर विजेते, निर्माते हार्वे वाइनश्टीन यांच्यावर हॉलिवूडमधील वीस पेक्षा जास्त अभिनेत्रींनी लैंगिक शोषण करत असल्याचा आरोप केला . या लैंगिक शोषणाविरुद्ध आवाज उठविण्यासाठी पिडीत महिलांनी हॅशटॅग 'मी टू' ही मोहीम सोशल मीडीया च्या माध्यमातून सुरू केली . या मोहिमेमुळे जगभरातील महिला, मुली त्यांच्यावर होणाऱ्या किंवा झालेल्या लैंगिक अत्याचारांविरुद्ध बोलत आहेत हे या मोहिमेचे मोठं यश मानावे लागेल . लैंगिक अत्याचार होऊन देखील सामाजिक दबावामुळे अनेक महिला , मुली या लैंगिक शोषणाविरुद्ध मुक्तपणे बोलताना दिसून येत नाहीत . हॉलिवूड मध्ये चालू झालेली ही लैंगिक शोषणाविरुद्धची चळवळ आता बॉलिवूड, पत्रकारिता तसेच पुण्यातील सिम्बायोसिस कॉलेज पर्यंत येऊन पोहोचली आहे . सिम्बायोसिस महाविद्यालयाच्या आजी माजी विद्यार्थिनींनी त्यांच्या बाबतीत घडलेल्या लैंगिक शोषणाच्या विरोधात समाजमाध्यमातून आवाज उठवला आहे .विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार स्थापन करण्यात आलेल्या तक्रार समितीद्वारे या लैंगिक अत्याचाराची दखल घेऊन कारवाई करण्यात येईल असं आश्वासन सिम्बायोसिस महाविद्यालयाच्या प्रशासनाला द्यावं लागलं आहे . पत्रकार आणि केंद्रीय राज्यमंत्री एम.जे अकबर यांच्यावर देखील सहा महिला पत्रकारांनी लैंगिक छळाचा आरोप केला आहे . अकबर यांच्यावर करण्यात आलेल्या या गंभीर आरोपांवर मोदी सरकारने मात्र मौन बाळगले आहे .या प्रकरणाबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर न देताच परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज निघून गेल्या .बेटी बचाव, बेटी पढाव असा नारा देणारं सरकार महिलांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध संवेदनशील असल्याचं मात्र दिसून येत नाही.

काही दिवसांपूर्वीच एका फोटो पत्रकाराने या मोहिमेअंतर्गत लैंगिक अत्याचाराचे आरोप केल्यामुळे गायक कैलास खेरला माफी मागावी लागली हे या मोहीमेच यशच म्हणावं लागेल. अभिनेत्री तनुश्री दत्ताने नाना पाटेकर यांच्यावर केलेला लैंगिक अत्याचाराचा आरोप ,दिग्दर्शिका विनिता नंदा यांनी ज्येष्ठ अभिनेते आलोकनाथ यांच्यावर केलेला बलात्काराचा आरोप या सर्व आरोपांची चौकशी होणं गरजेचं आहे . आरोप करणाऱ्या महिलांनी हे आरोप न्यायालयीन पातळीवर सिद्ध करण्याची जबाबदारी देखील स्वीकारली पाहिजे ,नाही तर हे आरोप बिनबुडाचे होते असा त्याचा अर्थ काढला जाईल. या मोहिमेचा आधार घेऊन एखाद्या व्यक्तीला विनाकारण बदनाम करणं देखील चुकीचं आहे . पुरुषप्रधान संस्कृतीत जगणाऱ्या महिलांना कधी ना कधी तरी पुरुषांकडून होणाऱ्या लैंगिक अत्याचाराचा सामना करावाच लागतो . इतके दिवस मूग गिळून हा अत्याचार सहन करणाऱ्या महिला या अत्याचाराविरुद्ध आवाज उठवत आहे ही स्वागतार्ह बाब आहे . जुन्या पिढीतील महिलांनी हा अन्याय सामाजिक दबावापोटी ,बदनामीच्या भीतीने निमूटपणे सहन केला मात्र नव्या पिढीतील महिला हा अन्याय शांत बसून सहन करणार नाहीत असा संदेश ही मोहीम देत आहे .महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध आवाज उठविणाऱ्या या मोहीमेने अप्रत्यक्षरित्या पुरुषी मानसिकतेविरुद्ध लढा उभा केला आहे .हा लढा अधिक व्यापक होऊन महिलांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचारांविरुद्ध जनजागृती होणं गरजेचं आहे .

दुष्काळी ढगांच्या छायेत महाराष्ट्र

सागर रौंदळ

हाताला काम नाही, शेतीला पाणी नाही, माळरानावर जिकडे बघावे तिकडे ओसाड जमीन दिसते, गुराढोरांचा चाऱ्याचा प्रश्न बिकट आहे मग यंदाचं साल गुजरणार कसं ?असा यक्षप्रश्न यावर्षी बळीराजाला सतावत आहे तर दुसरीकडे मोठ्या शहरांमध्ये पाणी कपातीमुळे अनेक छोट्या मोठया समस्या निर्माण झाल्या आहेत. कारण यावर्षी महाराष्ट्र त दुष्काळामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे

२०१३ च्या दुष्काळातून सावरत नाही त्यातच यावर्षी दुष्काळाचे ढग अधिक गडद झाले यामुळे राज्य चिंतातुर झाले असून बळीराजाची परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे राज्यातील १६४ तालुक्यांत सरासरी फक्त ७५ टक्के इतका पाऊस झाला. म्हणून सर्व विभागांमध्ये गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे आधीच शेतीमालाला नसलेला भाव, आणि त्यात यावर्षी पावसाची कमतरता यामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे पुरते मोडले आहे. खरीप हंगामातील पिके गेलीच पण परतीच्या पाऊसातुन काहीच हाती लागले नाही म्हणून रब्बी हंगामाचे काही खरे नाही. मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र या भागांची परिस्थिती गंभीर झालेली असून राज्यात आजघडीला 331 गावे, आणि ४७१ वाड्या वस्त्यांवर टँकर ने पाणी पुरवठा होत आहे. हेच प्रमाण मागच्या वर्षी १५५ गावांना १०७ टँकर द्वारे पाणीपुरवठा केला जात होता.

यावर्षी असलेला हा भेद अधिक चिंता वाढवत आहे. मराठवाड्यातील जिल्ह्यात पावसाची सरासरी केवळ ६० टक्के आहे म्हणून पिण्याच्या पाण्याची समस्या,जमिनीतील पाणीपातळीत झालेली घट, आणि शेतीमालातील उत्पन्न घट असा त्रिसूत्रीय सामना मराठवाडा करत आहे उत्तर महाराष्ट्रातील अनेक वाड्यावस्त्यात पिण्याच्या पाण्याची समस्या बिकट आहे, धुळे, नंदुरबार जळगाव या जिल्ह्यांत खरिपातील पिके जळून खाक झाली. तर नाशिक जिल्ह्यातील २३९ गाव, वाड्या वस्त्यांवर टँकर सुरू आहेत विशेषतः मालेगाव, सटाणा, सिन्नर, येवला या भागाची परिस्थिती अवघड आहे. अस्मानी आणि सुलतानी अशा दोन्ही स्तरांवर शेतकरी सध्या लढत आहेत. पश्चिम विदर्भामध्ये अक्षरशः कापूस, सोयाबीन ही पिके वाळून गेली तर पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, सोलापूर या जिल्ह्यांना दुष्काळाचा जोरदार सामना करावा लागत आहे.

संपूर्णतः ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मोडकळीस आला असून शासन स्तरावर गतीने प्रयत्न होताना दिसत नाही, जलयुक्त शिवार सारख्या योजनेचा तात्पुरता इलाजही काही कामी पडला नाही, असेच म्हणावे लागेल.केंद्राच्या निकषांवर दुष्काळ जाहीर होणार हे निश्चित मात्र त्यात जाचक अटी नको,एवढीच अपेक्षा राहील. केंद्राच्या निकषात राज्य बसविण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील राहील.कारण येऊ घातलेल्या २०१९ च्या लोकसभा निवडणूका! त्या पार्श्वभूमीवर विरोधकांनाही आयतेच कोलीत मिळाले असून त्याचा फायदा शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी करावा, एवढीच अपेक्षा!

मानसिक आरोग्याचे वाढते महत्व

सागर जाधव

मुलाखत



प्राध्यापिका जुही देशमुख

नुकताच जगभरात १० ऑक्टोबर हा दिवस जागतिक मानसिक आरोग्यदिन म्हणून साजरा करण्यातआला.सध्या शहरी आणि ग्रामीण भागातील रोजच्या धका-धकीच्या जीवनात मानसिक आरोग्यावर आजकाय परिणाम होतोय. या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मानसशास्त्र या विभागामधील प्राध्यापिका जुही देशमुख याच्याशी साधलेला संवाद.

प्र : १० ऑक्टोबर हा दिवस जागतिक आरोग्य दिन म्हणून साजरा करण्या मागची भूमिका काय आहे ?

उत्तर : शरीर आणि मन ही मानवी जीवनाची दोन्ही अंगे व्यवस्थित असतील तर व्यक्ती व्यवस्थित काम करू शकते. घरात, प्रवासात, आप्तेष्टांमध्ये वावरताना ती आत्मविश्वासाने वावरु शकते. मात्र यापैकी एखाद्या ठिकाणीही अडथळा येत असेल तर त्याचा मनःस्थितीवर आणि मग पर्यायाने वर्तनावर आणि एकूणच कामावर, नातेसंबंधांवर परिणाम दिसून येतात. सामान्यपणे कोणालाही विचारलं तर माणूस अगोदर शारीरिक व्याधींचाच विचार करतो. मानसिक आजारांचा विचार आज कोणी करत नाही, व्यक्ती शारीरिक झालेली व्याधी सहज पणे सांगते पण मला मानसिक ताण आहे हे मोकळे पणाने सांगत नाही किंवा हे स्वीकारत नाही. सगळीकडे हीच परिस्थिती होती, ती लक्षात घेऊन आपण मानसिक आरोग्य दिन साजरा करायला सुरवात केली.त्यानंतर जागतिक मानसिक आरोग्यावर बोलण्यास सुरवात झाली यामुळे जागरूकता वाढेल, लोकांना बोलण्याचा संकोच आहे तो कमी होईल. जस आपण इतर आजारांना सहज स्वीकारतो तस मानसिक आजारांनाही स्वीकारावे अशी या मागील भूमिका आहे.

प्र: मानसिक आरोग्य बिघडण्यामागील कारणे काय असू शकतात ?

उ : या मागे काही प्रमाणात अनुवांशिक कारणे, घरघुती अडचणीमुळे, बालपण कसे गेले आहे मुलांना कस ठेवलंय. मानसिक धक्का बसल्याने, जवळपास वातावरण कस आहे अशी खूप काही कारणे असू शकतात.

प्र : सध्या हृदयविकाराचे प्रमाण खूप वाढले आहे. याचा संबंध मानसिक आरोग्याशी आहे का?

उ : मानसिक ताण आणि हृदयविकार यांचा खूप जवळचा संबंध आहे. हे सर्वेक्षणातून सिद्ध झालेले आहे.अति ताण असेल तेव्हा हृदयविकाराचा झटका येईलच असे नाही पण कुठे ना कुठे याचा विपरीत परिणाम हृदयाच्या आरोग्यावर होताना दिसून येतोय.

प्र : भारत हा तरुणांचा देश आहे असं म्हंटल जात, पण याच तरुणांमध्ये आज नैराश्याचे प्रमाण जास्त दिसून येतंय त्या मागचं कारणे काय?

उ : खूप-खूप मोठ्या अपेक्षा तरुण वर्ग बाळगतो आणि त्या पूर्ण झाल्या नाही तर त्यांच्या मानसिकतेवर ताण वाढत जातो. स्पर्धा परीक्षेत यश मिळाले नाही म्हणजे सगळे संपले, अशी मानसिकता सामान्यपणे तरुणांमध्ये तयार होते, यामुळे नैराश्य वाढते, यासाठी आनंददायी जीवन जगणे , आपले छंद जोपासणे हा त्यामागील उपाय असू शकतो.

प्र : जागतिक मानसिक आरोग्य दिनाबद्दल जनजागृतीसाठी काय करणे आवश्यक आहे?

उ: यासाठी विद्यापीठ स्तरापासून खेड्यापर्यंत जनजागृती होणे आवश्यक आहे. दोन दिवस आमच्या विभागाने अनेक ठिकाणी जाऊन या संबंधी माहिती दिली. वेगवेगळे व्याख्याते बोलून मार्गदर्शन केले. यामुळे नागरिकांमध्ये त्याबद्दल जाणीव निर्माण होईल .

बढती आता खुल्या प्रवर्गातूनच भरणार

मुंबई : सरकारी नोकऱ्यांमध्ये पदोन्नती देताना केवळ खुल्या प्रवर्गातील पदं भरण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे सध्या आरक्षित वर्गातील पदं पदोन्नतीने भरली जाणार नाहीत. राज्यातील 154 मागासवर्गीय पोलीस उपनिरीक्षकांची नियुक्ती रद्द करुन त्यांना मूळ पदावर पाठवल्यानंतर झालेल्या गोंधळामुळे सरकारने हे पाऊल उचललं आहे.

पदोन्नतीमध्ये आरक्षण द्यायचं की नाही याचा निर्णय संबंधित राज्यांनी घ्यावा, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने 26 सप्टेंबर 2018 रोजी दिला होता. परंतु राज्य सरकारने अद्याप याबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही.

अश्मयुगीन अवशेषांचे प्रदर्शन

डेक्कन कॉलेज , टिळक विद्यापीठ आणि जीविधा संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने अश्मयुगीन दगडांचे व लेण्यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन घोले रोडवरील पंडीत जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवनात भरवण्यात आले होते . (छायाचित्रकार : गजानन घायाळ)

लोकशाहीत घुसमटणाऱ्या आवाजाची निर्भीड मांडणी

पुस्तक परीक्षण : मयूर डुमणे

लोकशाहीचा आत्मा असणाऱ्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी कशाप्रकारे होत आहे हे मांडण्याचा प्रयत्न पत्रकार रविशकुमार यांनी या पुस्तकातून केला आहे .नजीकच्या काळात घडणाऱ्या घटनांचा संदर्भ देत त्यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा होणारा ऱ्हास या पुस्तकात मांडला आहे .सरकारविरुद्ध बोलणाऱ्या , प्रश्न विचारणाऱ्या पत्रकारांना देशद्रोही ठरवण्यात येऊन त्यांना धमक्या दिल्या जात आहेत , व्हाट्स अप च्या माध्यमातून अफवा पसरवून पत्रकारांचे चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न केला जातोय , सरकारविरोधी आवाज उठविणाऱ्या पत्रकारांवर झुंडी मार्फत हल्ला केला जात असल्याची व्यथा लेखक पुस्तकातून विविध उदाहरणे देऊन सांगतोय .जनतेची मते सरकारच्या बाजूने प्रभावित करण्यासाठी तसेच सरकारविरोधी बोलणाऱ्या व्यक्तींना बदनाम करण्यासाठी फेक न्युज पसरवल्या जात आहेत सामान्य जनतेला वास्तवापासून दूर नेण्यासाठी फेक न्यूज चा आधार घेतला जाऊन जनतेची दिशाभूल केली जात असल्याच मत पुस्तकात व्यक्त करण्यात आलं आहे . पत्रकार बसित मलिकला दिल्ली मध्ये झालेली मारहाण आणि पत्रकार गौरी लंकेश यांची झालेली हत्या या दोन घटना पत्रकारांनी आता शांत रहावं नाही तर बसित मलिक , गौरी लंकेश सारखी तुमचीही अवस्था करू असा संदेश देऊन गेल्या .एकंदरीतच सत्याची कास धरून निर्भीडपणे पत्रकारिता करणाऱ्या पत्रकाराला कोणकोणत्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे याची मांडणी पुस्तकातील "भयपेरणीचा राष्ट्रीय प्रकल्प" या प्रकरणात दिसून येते.

गोमांस बाळगल्याच्या कारणावरून जूनैद खानची हत्या गर्दीने भरलेल्या रेल्वे प्लॅटफॉर्मवर करण्यात आली त्यावेळी त्याच्या मदतीला कोणीही धावून आले नाही अशी खंत लेखक व्यक्त करतोय. गोहत्येच्या नावाखाली झुंडशाही कडून मुस्लिमांच्या होणाऱ्या हत्या , व्यक्तिपूजा करणाऱ्या भक्तांच्या टोळ्या ही उदाहरणे लक्षात घेता नव्याने निर्माण झालेली झुंडशाही हे भारतीय लोकशाही पुढील प्रमुख आव्हान असल्याचं लेखकाच मत चालू घडामोडी पाहता मनापासून पटणार आहे .भारतीय लोकशाही समोर निर्माण झालेल्या आव्हानांबरोबरच हे पुस्तक जातीव्यवस्था ,आंतरजातीय आंतरधर्मीय विवाह , प्रेम अशा सामाजिक विषयावर देखील भाष्य करते .धर्माच्या आणि जातीच्या भिंती तोडून प्रेम करू पाहणाऱ्या तरुणाईची हत्या केली जात असल्याच भीषण वास्तव पुस्तकात मांडल आहे .

सद्यस्थितीत भारतीय लोकशाही समोरील असणारी आव्हाने आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याची होणारी गळचेपी समजून घ्यायची असेल तर हे पुस्तक नक्की वाचलं पाहीजे .सुनील तांबे यांनी रविशकुमार यांच्या या पुस्तकाचा मराठी अनुवाद अत्यंत सोप्या भाषेत केला आहे .

पुस्तक : द फ्री व्हॉईस
मूळ लेखक : रविशकुमार
मराठी अनुवाद : सुनिल तांबे
प्रकाशक : मधूश्री पब्लिकेशन

थोडक्यात

नागराज मंजुळे निर्मित 'नाळ'चा ट्रेलर रिलीज

मुंबई : फँड्री आणि सैराट च्या अभूतपूर्व यशानंतर दिग्दर्शक नागराज मंजुळे 'नाळ' चित्रपटाद्वारे निर्मिती क्षेत्रात पदार्पण करत आहेत .नागराज मंजुळे यांनी फेसबुकवर 'नाळ' चित्रपटाचा टिझर प्रदर्शित करून या चित्रपटाची घोषणा केली .'सैराट' चित्रपटाचे कॅमेरामन सुधाकर रेड्डी यांनी 'नाळ' चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. 'माझ्याच मनातली गोष्ट सुधाकर सांगतोय,' असं नागराज यांनी त्यांच्या फेसबुक पोस्टमध्ये लिहिलं आहे. हा चित्रपट येत्या १६ नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे.

पूर्व भागाचे पाणी 'जलसंपदा'ने तोडले

पुणे : जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी खडकवासला धरणावरील महापालिकेचे पंप थेट बंद करत शहराच्या पूर्व भागाचे पाणी तोडले. परिणामी पूर्व भागातील नागरिकांचे मोठे हाल झाले. गुरुवारी महापौर मुक्ता टिळक यांनी थेट जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांच्याकडे जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांची तक्रार केली. त्यानंतर शहराला प्रतिदिन १३५० दशलक्ष लिटर पाणी देण्याचे महाजन यांनी मान्य केले.

बारा दिवसांनंतरही पुनर्वसन मंदगतीने

पुणे : मागील महिन्यांमध्ये दांडेकर पुलाजवळील झालेल्या कालवा दुर्घटनेला बारा दिवस उलटून गेले तरी बधितांना आवश्यक ती मदत मिळाली नाही व त्यांच्या पुनर्वसनाचे काम मंदगतीने सुरुवात आहे काही दिवसापूर्वी महापालिका आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी संबंधित नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली तरी कामाला अपेक्षित गती मिळत नाही.

झाकीर नाईकच्या मालमत्तांवर टाच

मुंबई : वादग्रस्त इस्लामिक धर्मगुरु आणि इस्लामिक रिसर्च फाऊंडेशन या संस्थेचा संस्थाप झाकीर नाईकच्या मुंबईतील पाच मालमत्तांवर टाच आणण्याचे आदेश राष्ट्रीय तपास यंत्रणा अर्थात एनआयएच्या मुंबईतील कोर्टाने दिले आहेत. झाकीर नाईकसाठी हा मोठा धक्का मानला जात असून तपास यंत्रणांनी झाकीर नाईकभोवती कारवाईचा फास आवळण्यास सुरूवात केल्याचे दिसून येते आहे.

प्राध्यापकांचा संप अखेर मागे

मुंबई : सातवा वेतन आयोग लागू करणे, संप काळातील थकीत वेतन, प्राध्यापकांची भरती यासह अन्य विविध मागण्यासाठी गेले सोळा दिवस सुरू असलेले काम बंद आंदोलन एमफुक्टोने मागे घेतले असून, शिक्षण मंत्र्यांनी प्राध्यापकांच्या मागण्या नवीन इतिवृत्तात मान्य करण्याचे सकारात्मक निर्देश दिल्यामुळे हे आंदोलन मागे घेत आहे असे एमफुक्टो चे अध्यक्ष मुखोपाध्याय यांनी म्हटले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागाच्या विद्यार्थ्यांचे प्रायोगिक प्रकाशन. *प्रकाशक : डॉ. उज्वला बर्वे (विभागप्रमुख) *विद्यार्थी संपादक : मयूर डुमणे , सागर रौंदळ , गजानन घायाळ , सागर जाधव , अनिल माने